**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## स्वच्छतेची मानसिकता प्रत्येकामध्ये निर्माण व्हावी - कुलगुरु
## विद्यापीठात 'स्वच्छ पंधरवाडा अभियाना' निमित्त स्वच्छता दिंडीचे आयोजन

अमरावती-

स्वच्छता ही स्वाभाविक प्रक्रिया असून कचरा होवू न देणे, हा त्यामागचा महत्वाचा भाग आहे. स्वच्छ अभियाना निमित्ताने स्वच्छतेसह कचरा होवू न देणे, अशी संस्कारक्षम मानसिकता निर्माण व्हावी, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. माननीय पंतप्रधान ना.श्री. नरेंद्र मोदी यांचे पुढाकाराने सुरु असलेल्या 'स्वच्छ भारत मिशन' अभियानांतर्गत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. अभियानाच्या पहिल्याच दिवशी विद्यापीठ परिसराची स्वच्छता करण्यात आली, त्याप्रसंगी उपस्थितांना कुलगुरु संबोधित करीत होते.

विद्यापीठ परिसरातील कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या संदेशशिल्पाला अभिवादन करुन स्वच्छता दिंडीला विद्यापीठाच्या मुख्य प्रवेश द्वारापासून सुरुवात झाली. या दिंडीमध्ये प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, व्य.प. सदस्य डॉ. प्रसाद वाडेगांवकर, माजी कुलगुरु डॉ. विलास सपकाळ, प. व मू. मंडळाचे संचालक डॉ.एच.आर. देशमुख, प्रभारी वि. व ले. अधिकारी श्री मंगेश वरखेडे, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. रविंद्र सरोदे, रा.से.यो. चे प्रभारी संचालक डॉ. प्रशांत शिंगवेकर तसेच सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी यांचा समावेश होता.

'गोपाला गोपाला देवकीनंद गोपाला', 'स्वच्छ भारत - सुंदर भारत' आदी स्वच्छतेविषयक नारे देवून दिंडी मार्गक्रमण करीत मुख्य प्रशासकीय इमारत येथे पोहोचली. त्या ठिकाणी सर्वांनी हातात खराटे घेवून विद्यापीठ परिसर स्वच्छ केला.

कुलसचिव डॉ. अजय देशमुख प्रास्ताविक करतांना म्हणाले, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार दि. १३ ते २८ ऑक्टोबर असा 'स्वच्छता पंधरवाडा अभियान' विद्यापीठ आणि विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये राबविल्या जाणार आहे. त्यानुषंगाने विद्यापीठातील विभाग परिसर, नस्त्या व कागदपत्रांची स्वच्छता या अभियानांतर्गत करण्यात येणार असून त्यामुळे कार्यालयात स्वच्छ आणि आनंदी वातावरण राहण्यास सुलभ होणार आहे. संचालन राजेश पिदडी यांनी, तर आभार अभिजित काळे याने मानले.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १३/१०/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी